# प्रेसनोट दि. ०६.०४.०२०२१

श्री. शहाजी आबा पाटील, वय ५६ वर्ष, निरीक्षक उत्पादन शुल्क, इस्लामपूर वर्ग-२ यांना १५,०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार हे परमिटरूम बिअरबार चालक असून त्यांचे परमिटरूम बिअरबारचे लायसन्स रिनीव करून देण्याकरीता उत्पादन शुल्क, इस्लामपूर येथील प्रमुख श्री. पाटील यांनी तक्रारदार यांचेकडे २०,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.०५.०४.२०२१ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालयात दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक ०५.०४.२०२१ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये लोकसेवक श्री. पाटील, प्रमुख उत्पादन शुल्क, इस्लामपूर यांनी तक्रारदार यांचे परमिटरूम बिअरबारचे लायसन्स रिनीव करून देण्याकरिता १५,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दि.०६.०४.२०२१ रोजी उत्पादन शुल्क, इस्लामपूर या ठिकाणी सापळा लावला असता श्री. शहाजी आबा पाटील, वय ५६ वर्ष, निरीक्षक उत्पादन शुल्क, इस्लामपूर वर्ग-२ यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून १५,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने श्री. शहाजी आबा पाटील, वय ५६ वर्ष, निरीक्षक उत्पादन शुल्क, इस्लामपूर वर्ग-२ यांचे विरुध्द इस्लामपूर पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुहास नाडगौडा सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे व श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सांगली यांचे मार्गदर्शनाखाली, श्री. गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार अविनाश सागर, सलीम मकानदार, संजय संकपाळ, अजित पाटील, भास्कर भोरे, रविंद्र धुमाळ, राधिका माने, सिमा माने, यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in